# पुरक वाढीव प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर विद्यालयनिहाय रिक्त जागांचा तपशील प्रसिध्द करण्याचा दिनांक | २५-०१-२०२१ |
| २ | संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्ज (रू.४००/- अराखीव वर्गवारीसाठी व रू.२००/- राखीव प्रवर्गासाठी) दाखल करण्याचा कालावधी | २५-०१-२०२१ ते ३०-०१-२०२१ |
| ३ | नव्याने प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जांची छाननी नंतर सर्व साधारण गुणवत्ता यादी संकेस्थळावर प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०२-०२-२०२१ |
| ४ | रिक्त जागेनुसार ज्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाच्या आहे अशा विद्यालयात मुळ प्रमाणपत्रे व आवश्यक त्या शुल्कासह उमेदवारांने उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा दिनांक | ०४-०२-२०२१ |
| ५ | रिक्त जागेनुसार वरील कालावधीत प्रवेशीत उमेदवारांच्या यादीस जिल्हयातील घटक विद्यालयाच्या प्राचार्यांनी पडताळणी करून प्रवेशास मान्यता देण्याचा कालावधी | ०८-०२-२०२१ |
| ६ | मान्यता यादीनुसार प्रवेशीत विद्यार्थ्यांना संबधीत विद्यालयात उपस्थित राहून वर्ग सुरू होण्याचा दिनांक | ०९-०२-२०२१ |
| ७ | विहीत नमुन्यातील अंतिम प्रवेश याद्या विद्यापीठास संबधीत सर्व अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीसह सादर करण्याचा दिनांक | १६-०२-२०२१ |

**या वाढीव प्रवेश फेरीसाठी प्रवेश मार्गदर्शक नियम / सुचना खालील प्रमाणे राहातील.**

१. या प्रवेश फेरीची प्रवेश प्रक्रिया प्रत्येक विद्यालयाच्या प्रवेश प्रक्रिया केंद्रात राबविण्यात येईल. प्रवेश इच्छूक विद्यार्थ्यांनी रिक्त जागेवरील प्रवेशासाठी संबधीत विद्यालयात प्रवेश कार्यक्रमानुसार उपस्थित राहून प्रवेश घ्यावा लागेल. या प्रवेश फेरीनंतर प्रवेश देण्यास विद्यालयांना अनुमती देण्यात येणार नाही.

२. या प्रवेश फेरीसाठी कुलसचिव यांचे पत्र क्र.प्रवेश-२०२०/प्र.क्र.०१/विद्या-१०(ब) दिनांक २१-१०-२०२० अन्वये जिल्हा बंदीची अट शिथील असेल तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्राच्या बाहेरील विद्यार्थ्यांसाठी विभाग बंदीची अट शिथील असेल, सबब महाराष्ट्रातील सर्वच विद्यार्थी प्रवेशास पात्र असतील.

३. चालु शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेत ज्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नसेल ते विद्यार्थी देखील प्रवेशास पात्र असतील. परंतू रिक्त जागेनुसार व गुणवत्तेनुसार त्यांना प्रवेश घ्यावा लागेल.

४. चालु शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेत जे विद्यार्थी त्रुटीमुळे प्रवेशास पात्र होऊ शकले नाहीत त्यांनाही संबधीत त्रुटी पुर्ततेसाठी प्रमाणपत्रे अपलोड करण्याची संधी देण्यात येईल. त्रुटी पुर्ततेनंतरच हे विद्यार्थी या वाढीव फेरीसाठी पात्र होऊ शकतील. परंतू रिक्त जागेनुसार व गुणवत्तेनुसार त्यांना प्रवेश घ्यावा लागेल

५. प्रवेशाच्या दिवशी सकाळी ९ ते १२ या कालावधीत प्रवेश यादीतील (पुर्वीच्या व वाढीव फेरीतील ) विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून नोंदणी करावी. व त्यांनतर दुपारी रिक्त जागा नुसार व गुणवत्तानूसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. प्रवेशाची नोंद ऑनलाईन प्रमाणपत्रे पडताळणी नंतर लगेच करण्यात यावी. प्रवेशासाठी संबधीत संस्थांनी विद्यार्थ्यांचे प्रवेश पत्र काढून घ्यावेत. यासाठी आवश्यक ती सर्व सुविधा केटीपीएल तर्फे केलेली असेल व त्यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे संबधीत संस्थांनी प्रवेश प्रक्रिया पुर्ण करावयाची आहे.

६. रिक्त जागा भरतांना नियमाच्या अधिन राहून रिक्त जागा भराव्यात. अवैध प्रवेश होणार नाहीत याची संबधीत संस्थाच्या प्राचार्यानी दक्षता घ्यावी.

७. प्रवेश पुस्तीका २०२०-२१ मधील प्रवेश पात्रता व इतर सर्व मार्गदर्शक नियम या फेरीस देखील लागु रहातील.

८. या प्रवेश फेरीची जाहीर प्रगटन हे विभागीय / जिल्हास्तरीय दैनिक वर्तमानपत्रातून संबधीत खाजगी संस्थामार्फत करण्याचे प्रस्तावीत आहे. तसेच विद्यापीठ संकेतस्थळावर देखील देण्यात येईल.

९. या प्रवेश फेरीच्या प्रक्रियेसाठी लॉग इन मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी केटीपीएल यांची असेल. तसेच प्रवेश प्रक्रिये संबधी संस्थेने अवलंबिण्याची कार्यपध्दती संबधीत संस्थांना सुचीत करावी व प्रवेश प्रक्रिया नियमाच्या आधिन राहून पारपाडावी.

स्थळप्रत मा.कुलसचिव यांचे स्वाक्षरीत

कुलसचिव करिता

(ग.अ.भालेराव, उपकुलसचिव (विद्या))